**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार, दिनांक ११ ऑक्टोबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **लाखो अनुयायांच्या उपस्थितीत धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा मुख्य सोहळा उद्या संध्याकाळी होणार संपन्न; दिक्षाभूमी परिसर आकर्षक रोषणाईने सजला.**
2. **वर्ष २०१६-१७ ते २०२१-२२ या आर्थिक वर्षात ग्रामीण कुटुंबांचं सरासरी मासिक उत्पन्न ५७ टक्क्यांनी वाढल्याचं नाबार्डचं सर्वेक्षण.**
3. **विधानसभा निवडणुकांत उत्तर नागपूर आणि यवतमाळ मधील उमरखेडची जागा मागणार असल्याचं रिपब्लिकन पक्ष प्रमुख रामदास आठवले यांचं प्रतिपादन.**
4. **यंदाचा शांततेचा नोबेल पुरस्कार निहोन हिदानक्यो या जपानच्या संस्थेला जाहीर.**
5. **महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या वतीनं जलपर्यटन महोत्सव 'अक्वाफेस्ट नागपूर'चं उद्यापासून फुटाळा तलाव परिसरात आयोजन.**

---

दीक्षाभूमी मुख्य सोहळा

डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमीच्या वतीनं ६८व्या धम्मचक्र प्रवर्तन वर्धापन दिन कार्यक्रमाचा  मुख्य सोहळा उद्या दिनांक १२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६वाजता आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याला मुख्य अतिथी म्हणून उत्तरप्रदेशच्या कुशीनगर इथले भिक्षु संघाचे अध्यक्ष भदंत ए.ए.बी. ज्ञानेश्वर, आणि महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाचे प्रणेते आकाश लामा तसंच बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमीचे अध्यक्ष तथा धम्मसेना नायक भदंत आर्य नागार्जुन सुरेई ससाई हे असतील. राज्यसह देशविदेशातील लाखो अनुयायी हा नेत्रदीपक सोहळा अनुभवण्यासाठी नागपुरात दाखल झाले आहे. या कार्यक्रमासाठी नागपूर दीक्षाभूमि परिसरात आकर्षक रोषणाई करण्यात आली आहे. बौध्द अनुयायांना प्रशासनाकडून विविध आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून धम्मचक्र प्रवर्तन दिनाची जय्यत तयारी प्रशासनानं केली आहे. तत्पूर्वी, नागपूरातील पवित्र दीक्षाभूमीवर आज दीक्षाभूमी स्मारक समितीचे सदस्य आणि समता सैनिक दल यांचा उपस्थितीत भदंत ससाई यांच्या नेतृत्वात पंचशिल ध्वजारोहण करण्यात आलं. याशिवाय ६८व्या

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमी इथं  माहिती आणि मार्गदर्शन केंद्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि मागासवर्गीय कर्मचारी संघटना यांच्या संयुक्त विद्यमानं  सुरू केलं जात आहे. कृषी महाविद्यालय वसतीगृहाजवळ दीक्षाभूमी नागपूर इथं उद्या  सकाळी ११:३० वाजता विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असलेल्या माहिती आणि मार्गदर्शन केंद्राचं उद्घाटन करण्यात येणार आहे. दरम्यान, दीक्षाभूमीवर येणाऱ्या अनुयायांना कामठीतल्या ड्रॅगन पॅलेस टेम्पलला भेट देता येणार आहे. त्यासाठी एसटी महामंडळाच्या नागपूर विभागातर्फे आज पासून  ड्रॅगन पॅलेससाठी काचीपुरा चौक आणि मोरभवन इथून विशेष बसेसची सोय करण्यात आली आहे.

---------------------------------------

विजयादशमी सोहळा-संघ

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी सोहळा उद्या शनिवारी सकाळी सात वाजून 40 मिनिटांनी रेशीमबाग मैदानावर आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून भारतीय अंतराळ संशोधन केंद्र अर्थात इस्रोचे पूर्व अध्यक्ष डॉक्टर के राधाकृष्णन यांची उपस्थिती राहणार आहे. सरसंघचालक डॉक्टर मोहन भागवत यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न होणार असून तत्पूर्वी सकाळी सव्वा सहा वाजता पथसंचलन होणार आहे.

---------------------------------------

अश्विनी वैष्णव

माहिती आणि प्रसारण तसंच रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव उद्या सकाळी रेशीमबाग इथं विजयादशमी उत्सवात सामील होणार आहेत. त्यानंतर ते धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमीला भेट देतील. त्यानंतर ते अजनी येथील माधेपुरा इलेक्ट्रिक लोकोमोटिव्ह या कारखण्याला देखील  भेट  देणार  आहेत. दरम्यान,  नॅशनल  इन्स्टिट्यूट  ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी आणि महाराष्ट्र सरकार यांच्यात ऑटोमेशन आणि रोबोटिक्स क्षेत्रात सामंजस्य करार झाला. केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी मंत्री अश्वनी वैष्णव आणि महाराष्ट्राचे उच्च आणि  तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत नवी दिल्लीत या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

---------------------------------------

सरासरी मासिक उत्पन्न

वर्ष २०१६-१७ ते २०२१-२२ या आर्थिक वर्षात ग्रामीण कुटुंबांचं सरासरी मासिक उत्पन्न ५७ टक्क्यांनी वाढल्याचं नाबार्डच्या सर्वेक्षणात नमूद करण्यात आलं आहे. वर्ष २०१६-१७ मध्ये ग्रामीण कुटुंबांचं सरासरी मासिक उत्पन्न ८ हजार ५९ रुपये होतं; २०२१-२२ मध्ये  ते १२ हजार ६९८ रुपयांपर्यंत वाढलं आहे. ग्रामीण भागातल्या कुटुंबांचा मासिक

खर्चही ६ हजार ६०० रुपयांवरून ११ हजार २०० रुपयांवर गेला आहे; तसंच या कुटुंबांकडून होणारी आर्थिक बचतही वाढली आहे. देशातल्या ग्रामीण कुटुंबांमध्ये विमा सुरक्षेतही लक्षणीय वाढ झाल्याचं या सर्वेक्षणात म्हटलं आहे. सर्वेक्षणाच्या आकडेवारीनुसार, किमान एक सदस्य विमा धारक असलेल्या कुटुंबांचं प्रमाण २५ टक्क्यांवरून ८० टक्क्यांच्या वर गेलं आहे. ग्रामीण भागात किसान क्रेडिट कार्ड महत्त्वाचं ठरत असून पेन्शन धारक कुटुंबांची संख्या १९ टक्क्यांवरून साडे २३ टक्के झाली आहे. दरम्यान, थकीत कर्ज असलेल्या कुटुंबांचं प्रमाणही वर्ष २०१६-१७ मधल्या ४७ टक्क्यांवरून २०२१-२२ मध्ये ५२ टक्क्यांपर्यंत वाढलं आहे.

रामदास आठवले पत्रकार परिषद

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या हयातीत ज्या रिपब्लिकन पक्षाची संकल्पना केली होती त्यामध्ये सर्व जातीसमूहांचा समावेश होता. अशीच व्यापक भूमिका घेऊन आपण आपला पक्ष महाराष्ट्रासोबतच आसाम, मणिपूर या पूर्वेकडील राज्यात देखील वाढवला आहे. परंतु रिपब्लिकन पक्षातील अंतर्गत गटबाजी मुळे समाजाचं नुकसान होत असल्याचं मत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज नागपूरमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेत व्यक्त केलं. महायुतीमध्ये विधानसभेच्या जागावाटपाबाबत चर्चा सुरु असून रिपब्लिकन पक्षाला ८ ते १० जागांची मागणी आम्ही करणार आहोत. या सर्व जागा आम्ही रिपब्लिकन पक्षाच्या चिन्हा वरच लढू असं आठवले यांनी स्पष्ट केलं. यामध्ये उत्तर नागपूर आणि यवतमाळ मधील उमरखेडची विधानसभेची जागा देखील समाविष्ट असल्याचं त्यांनी सांगितलं.

---------------------------------------

शांतता नोबेल पुरस्कार

वर्ष २०२४ चा शांततेचा नोबेल पुरस्कार निहोन हिदानक्यो या जपानच्या संस्थेला आज जाहीर झाला. हिरोशिमा आणि नागासाकीवर झालेल्या अणुबॉम्ब पीडितांसाठी ही संस्था काम करते. जग अण्वस्त्रमुक्त करण्यासाठी आणि प्रत्यक्षदर्शींच्या कहाण्यांमधून अण्वस्त्रांचा वापर पुन्हा कधीही होऊ नये, याद‍ृष्टीनं या संस्थेनं केलेल्या प्रयत्नांचा सन्मान म्हणून यंदाचा नोबेल शांतता पुरस्कार या संस्थेला देत असल्यानं नॉर्वेजियन नोबेल समितीनं म्हटलं आहे.

---------------------------------------

अग्निवीरांचा मृत्यू

नाशिकच्या देवळाली कॅम्प इथं आर्टिलरी फिल्ड फायरिंग रेंजमध्ये तोफ चालवण्याचा सराव सुरू असताना तोफगोळ्याचा स्फोट होऊन दोन अग्निवीरांचा मृत्यू झाला आहे तर अन्य एक अग्निवीर जखमी झाला आहे. गोहिल विश्वराज सिंग आणि सैफत शित

अशी या मृत झालेल्या अग्निवीरांची नावं आहेत. देवळाली कॅम्पमध्ये तोफेचा सराव सुरू असताना तोफेजवळच गोळ्याचा स्फोट झाला आणि त्याचे तुकडे अग्निवीरांच्या शरीरात घुसल्याने ते गंभीर जखमी झाले. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. तिथे उपचारांदरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

---------------------------------------

‘ॲक्वाफेस्ट नागपूर’

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या वतीनं जलपर्यटन महोत्सव ‘ॲक्वाफेस्ट नागपूर’चं उद्यापासून 14 ऑक्टोबर पर्यंत आयोजन करण्यात आलं आहे. फुटाळा तलाव, वायुसेना नगर इथं उद्या सकाळी 10 वाजता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या महोत्सवाचं उद्घाटन होणार आहे. राज्याचे पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांच्या नेतृत्वात आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोजकुमार सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनात होत असलेल्या या जलक्रीडा महोत्सवात बोटींगचे विविध अनुभव नागपूरकरांना घेता येणार आहे. पर्यटनाविषयी जागृती निर्माण करणे, मनोरंजन करणे, साहसी क्रीडाविषयक आवड निर्माण करणे, जलसंपत्तीचे जतन, संवर्धन आणि सुरक्षिततेचे महत्त्व पटवून देण्याचा या महोत्सवाचा उद्देश आहे.

---------------------------------------

तुकडोजी महाराज पुण्यतिथी

आज राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा स्मृतिदिन असून आजचा दिवस 'मानवता दिन म्हणून पाळण्यात येतो. आज राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चौक मानेवाडा इथं सकाळी साडेसात वाजता देशभक्तीपर समूहगीतांचं आयोजन करण्यात आलं होतं. याप्रसंगी एक हजार शालेय विद्यार्थ्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रचित राष्ट्रभक्तीपर गीतांचं समूह गायन करून राष्ट्रसंतांच्या स्मृतींना श्रद्धांजली अर्पण केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात देखील पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आज सकाळी पार पडला. त्यानंतर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासनातर्फे लघु चित्रपट दाखविण्यात आला.

---------------------------------------

तीर्थदर्शन

राज्यातील जनतेला विविध तिर्थक्षेत्रांना भेट देण्याचं स्वप्न असत, ‘मुख्यमंत्री तिर्थदर्शन योजनेद्वारे’ त्यांचं हे स्वप्न प्रत्यक्षात आल्याच्या भावना व्यक्त करत उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर जिल्हयातील तिर्थयात्रेकरुंच्या रेल्वेला दूरदृश्य प्रणालीद्वारे शुभेच्छा देत रवाना केलं. नागपूर रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक

8 वर मुख्यमंत्री तिर्थदर्शन योजनेंतर्गत 'गौरव भारत' या विशेष रेल्वेने सुमारे 800 ज्येष्ठ नागरिक वाराणसी आणि अयोध्येसाठी मार्गस्थ झाले.

---------------------------------------------

हवामान

विदर्भात आज सर्व जिल्हयांमध्ये विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे. उद्या पश्चिम विदर्भासह वर्धा इथं वादळी पर्जन्यमान राहू शकतं. दरम्यान आगामी काही तासांत  नागपूर, वर्धा, गडचिरोली, बुलढाणा, वाशिम, चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्हयांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

---------------------------------------------